महाराष्ट्र शासन

# जलसंपदा विभाग

**अधीक्षक अभियंता (दरवाजे) यांचे कार्यालय**

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व परिमंडळीय अधिकारी, नाशिक परिमंडळ,
दिंडोरी रोड, नाशिक-४२२ ००४
दूरध्वनी (परिमंडळ) : ०२५३ २५३४४६६
**E-mail** : nasikzone_wrd@yahoo.co.in


**संदर्भ :** १) शासन, विधी व न्याय विभाग, अधिनियम सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२१ (महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध मुख्य अधिनियम-२००७)

२) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र एसआरव्ही २०१७/प्रक्र ४१५ /कार्यासन १२ दि. ९/४/२०१८

३) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन अधीसुचना दि. २९/८/२०२४

४) या कार्यालयाचे पत्र जा क्र मसंसं(द)/परिमंडळ/आ-१/१९१ दि. २९/५/२०२४

४) नागरी सेवा मंडळाची बैठक क्र ८ दि. ३०/८/२०२४

## परिमंडळ कार्यालयीन आदेश क्र. ५ सन-२०२४

शासकीय ***कामकाजाच्या सोयीने*** **प्रशासकीय कारणास्तव** खालील कर्मचाऱ्यांची नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयांतर्गत बदली करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नांव (सर्वश्री) | पदनाम | सध्या कार्यरत असलेले कार्यालय | बदली करण्यात येणारे कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | संतोष श्रावण जाधव | भांडारपाल | अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षीतता संघटना, नाशिक | अधीक्षक अभियंता महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक |
| २ | सुनिल तुळशीराम शिंदे | भांडारपाल | अधीक्षक अभियंता, धुळे पा.प्र.मंडळ, धुळे | अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षीतता संघटना, नाशिक |

२/- वरील कर्मचाऱ्यांस **मुख्यालयात बदल होत असल्यास,** नियमानुसार बदली प्रवासभत्ता व पदग्रहण कालावधी प्रचलीत शासन निर्णयानुसार अनुज्ञेय राहील.

३/- सदरहु बदली ही संपुर्णपणे प्रशासकिय स्वरुपाची बाब असल्यामुळे संबंधीत कर्मचारी तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणुन बदली रद्द करण्यांचा प्रयत्न झाल्यास हि कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९८१ मधील नियम २३ चा भंग होत असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजुन त्यांचे विरूध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यांत येईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

४/- संबंधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यांत येते कि, सदर नियुक्ती /पदस्थापना दिलेल्या कर्मचाऱ्यांना आपल्या नियुक्तीच्या जागी हजर होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे.

५/- साप्रवि शासन निर्णय क्र एसआव्ही २०१७/प्रक्र ४१५ दि. ९/४/२०१८ मधील परिशिष्ट १ मधील क नुसार मुद्दा क्र २ व ३ अन्वये बदलीनंतर संबंधीत बदलीच्या ठिकाणी रुजु होत नसेल तर अशा कर्मचाऱ्याविरुध्द सक्षम प्राधीकारी यांनी नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

६/- संबंधीत कर्मचाऱ्यांना बदलीने पदस्थापनेचे आदेश निर्गमीत करतांना त्यांत कार्यमुक्तीचा दिनांक नमुद करण्यांत यावा.कार्यमुक्तीचे दिनांकानंतर ते बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कार्यरत होते त्या ठिकाणाहुन त्यांचे वेतन अथवा त्यांचे कोणतेही देयके अदा करु नयेत.

७/- संबंधीत कर्मचारी नियुक्तीच्या जागी हजर होण्यांसाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणी ते नविन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत या परिमंडळ कार्यालयास कळविण्यांत यावे.

८/- सदर नियुक्ती आदेश क्षेत्रीय स्तरावरुन प्राप्त रिक्त पदांचे अनुषंगाने करण्यांत आलेले आहे. तथापि, सदर नियुक्ती आदेशाचे कार्यालयात पद रिक्त नसल्यास त्याबाबत या परिमंडळ कार्यालयास तात्काळ अवगत करण्यांत यावे.

**९/- सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.**

(ज्ञा.वि.कहाणे)
उपविभागीय अभियंता (द)
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व
परिमंडळीय अधिकारी, नाशिक परिमंडळ,
नाशिक

स्थळप्रत अ.अ.(द) यांना मान्य आहे.
जा.क्र.मसंसं(द)/परिमंडळ/आ-१/३२३/सन २०२४
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व
परिमंडळीय अधिकारी, नाशिक परिमंडळ, नाशिक
दिनांक : **३०/८/२०२४**

**प्रत:- अधीक्षक अभियंता व प्रशासक/संचालक/सहसंचालक**

१) धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे
२) महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक
३) धरण सुरक्षितता संघटना, नाशिक

.......यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषीत.

**प्रत :** संबंधीत कर्मचारी यांना संबंधीत मंडळामार्फत माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.

**प्रत :** परिमंडळ कार्यालयीन आदेश धारिका सन २०२४